अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.: अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/२८४६
दिनांक :-२५/०७/२०२०

## -: आदेश :-

विषय :- श्री. वैभव कडलख, महापालिका सहाय्यक आयुक्त, हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय यांचे रजा कालावधीत त्यांचेकडील पदाच्या कामकाज व्यवस्थेबाबत.

संदर्भ :- आदेश जा.क्र. अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/२८२४, दि. २८/०७/२०२०.

श्री. वैभव कडलख यांचे रजा कालावधीत त्यांचेकडील महापालिका सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग या पदाचा अतिरिक्त पदभार श्री. निलेश देशमुख, महापालिका सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग यांचेकडे व सहाय्यक आयुक्त, हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय या पदाचा अतिरिक्त पदभार श्री. लहाणे विक्रम, उप अभियंता (स्थापत्य), हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय यांचेकडे संदर्भांकीत आदेशान्वये सोपविणेत आला आहे.

तथापि, प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने श्री. लहाणे विक्रम, उप अभियंता (स्थापत्य), हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय यांचेकडे सोपविणेत आलेला सहाय्यक आयुक्त, हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालय या पदाचा अतिरिक्त पदभार या आदेशान्वये रद्द करून तो श्री. सोमनाथ बनकर, सहाय्यक आयुक्त भवानीपेठ क्षेत्रिय कार्यालय यांचेकडे पुढील आदेश होईपर्यंत सोपविणेत येत आहे.

श्री. सोमनाथ बनकर, सहाय्यक आयुक्त भवानीपेठ क्षेत्रिय कार्यालय यांनी स्वत:चे पदाचे कामकाज सांभाळून उपरोक्तप्रमाणे अतिरिक्त कामकाज करावयाचे आहे, तसेच अतिरिक्त पदभार स्विकारलेबाबतचे निवेदन आमचेकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत :- खातेप्रमुख (सर्व), पुणे महानगरपालिका
यांजकडे माहिती व पुढील तजविजीसाठी . . .